



# दैनिक आकर्षण


संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे








वर्ष ५ । अंक १५४ । बुधवार ४ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322


# शिर्डीत एलसीबीच्या कारवाईत ४०० किलो मांगुर मासा जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शिर्डी पोलीस ठाणे हद्दीत केलेल्या कारवाईत ४०० किलो प्रतिबंधित मांगुर माशासह २९ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

एलसीबीचे पथक दिनांक ३ रोजी शिर्डी पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना पथकास गुप्त बातमीदारामार्फत ट्रक नंबर डब्ल्यूबी २५ एमएस ५०२३ यामध्ये केंद्र सरकारने प्रतिबंधीत केलेले मांगुर मासे भरुन नगर-मनमाड हायवे रोडवरील निमगाव बायपास रोड चौक येथून जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली. पथकाने तात्काळ शिर्डीचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, उपनिरीक्षक सागर काळे व पोलीस अंमलदार यांच्या सहकार्याने निमगाव बायपास रोडवर सापळा रचून संशयित ट्रक थांबवला व तपासणी केली असता आत मांगुर मासे आढळून आले.

ट्रकमधील स्वपन नियम डे (वय-३६ वर्षे रा. बामनगज थाना दत्तपुकुर जि.बाराशाद पश्चिम बंगाल), मकबुल रौफ सरदार (वय-३१ वर्षे रा. मसलंदापुर, निमतला तालुका गोवडमा जि. नॉर्थ २४ परगना, पश्चिम बंगाल), कुतुब आयुब मंडल (वय- ३५ वर्षे रा. मंदीया थाना बदुडीया जि. नॉर्थ २४ परगना, पश्चिम बंगाल), मृत्युंजय मुकुल विश्वास (वय-२७ वर्षे रा. हाबरा थाना हाबरा जि. नॉर्थ २४ परगना, पश्चिम बंगाल) ■ पान ४ वर

# नगरमध्ये डॉ. सुजय विखे पाटील यांचा जनता दरबार

## नागरिकांच्या अर्जांचा स्वीकार, कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी अहिल्यानगर शहरात जनता दरबार घेऊन नागरिकांच्या विविध समस्या व मागण्यांबाबतचे अर्ज स्वीकारले. सकाळी १०.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत ते नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहिले असून जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आपल्या अडचणी, सूचना आणि निवेदने त्यांच्या समोर मांडली. विळद घाट येथील इंजिनिअरिंग कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित या जनता दरबाराला जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. अनेक नागरिकांनी आपल्या प्रश्नांबाबत लेखी अर्ज सादर केले. डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्येक अर्ज काळजीपूर्वक ऐकून घेत संबंधित विषयांबाबत योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी यावेळी केला.



प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रथमच नगरमध्ये आगमन झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देत त्यांचे स्वागत केले तसेच घोषणाबाजी करत शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी माध्यमांशी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीबाबत संकेत दिले. १० ते १२ मार्च दरम्यान राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. बंगाल, तमिळनाडू, केरळ, ओडिशा आणि आसाम या राज्यांतील निवडणुकांसोबत महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदारसंघांच्या पोटनिवडणुकाही जाहीर होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वर्गीय कर्डिले साहेबांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघाबाबत बोलताना त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावना ■ पान ४ वर

# कामाच्या माध्यमातून पदाला न्याय द्या – आ. संग्राम जगताप

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पदाधिकारी निवडी जाहीर । युवक, ओबीसी, भटक्या विमुक्त जाती व एसटी महामंडळ जिल्हा अध्यक्ष पदांसाठी नवी नियुक्ती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) च्या विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. युवक शहर जिल्हाध्यक्षपदी सूरज कोतकर, ओबीसी शहर जिल्हाध्यक्षपदी दीपक खेडकर, कार्याध्यक्षपदी नितीन घोडके, भटक्या विमुक्त जाती शहराध्यक्षपदी सूरज शिंदे, तर एसटी महामंडळ अध्यक्षपदी ज्ञानदेव अकोलकर यांची निवड करण्यात आली.

निवडीचे पत्र आमदार संग्राम जगताप आणि शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या हस्ते नव्या पदाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी, नगरसेवक आणि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, मिळालेले पद हे फक्त व्हिजिटिंग कार्डपुरते नसून जबाबदारीचे आहे. पदाच्या माध्यमातून समाजातील लहानमोठे प्रश्न सोडवा, नागरिकांशी स्नेहाचे संबंध प्रस्थापित करा.

कामाच्या माध्यमातूनच पदाला न्याय देता येतो आणि समाजात आपली ओळख निर्माण होते. पदाचा उपयोग लोकसेवेसाठी करा सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून समाज एकत्र आणा. नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणारा 'कामाचा माणूस' म्हणून आपली छाप पाडा.

हेच खरे कार्यकर्तृत्व आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीला साजेसे काम करून दाखवा. कुठल्याही पदावर असताना स्वार्थ ■ पान ४ वर

# ओबीसी राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्षपदी दिपक खेडकर तर कार्याध्यक्षपदी नितीन घोडके यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष व माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या विचाराने व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार,प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे,आमदार संग्राम जगताप यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस च्या शहर जिल्हाध्यक्ष पदी दिपक रामदास खेडकर व कार्याध्यक्ष नितीन घोडके यांना आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.याप्रसंगी राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक दगडू मामा पवार,माणिकराव विधाते, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेवक कुमार सिंह वाकळे पाटील, रेवनाथ पवार,विकी जगताप, किरण मेहेत्रे,किरण




गुंजाळ,शैलेश सत्रे,संतोष हजारे,मनोज ताठे,अरुण शिंदे,ब्रिजेश ताठे,गणेश जाधव, संकेत लोंढे,महेश गाडे,भैय्या भागवत,पियुष हजारे, महेश सुडके, भ जरे, संकेत ताठे,स्वप्नील पडोळे, अतुल पडोळे, विश्वास शिंदे,प्रसाद बनकर,किरण जावळे, यश लिगडे, आशोक पवार,योगेश कोरेकर,संजय कोतकर, अमित भूतकर, योगेश भुजबळ, अक्षय भगत, योगेश आजबे,कान्हा भूतकर,राम वाडेकर, सुरज चांदगुडे,दादा जागताप, स्वप्नील मुसळे,आशीष भगत ऋषिकेश ताठे,रोहित देवराईकर, निलेश सत्रे,दादा टेमकर,सागर खेडकर, किरण पंधाडे,पंकज ताठे, मनोज खेडकर, विक्रम बोरुडे, प्रसाद बोरुडे,निखिल ताठे, गणेश शेलार आदी उपस्थित होते.

■ पान ४ वर

## आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन संपन्न

# आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी वरदानच ठरत आहे – पेमराज बोथरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परमपूज्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने व प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य हे ईश्वरीय कार्य समजून च होत आहे.मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.येथे होणाऱ्या आरोग्य शिबिरांचा लाभ हजारो रुग्णांना मिळाला आहे.सध्याच्या युगात न परवडणारा औषधाचा खर्च यामुळे अनेक रुग्णांना उपचार मिळणे अवघड झाले आहे. मोफत आरोग्य शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे.समाजातील सर्व घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी यासाठी जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य सामाजिक बांधिलकी ठेवून अत्यंत तळमळीने कार्य करीत असल्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल चा नावलौकिक सर्वदूर पसरला आहे.येथे येणाऱ्या रुग्णांना आपुलकीची वागणूक दिली जाते.येथील डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ सेवाभावी वृत्तीने सेवा देत आहेत.त्यामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांसाठी वरदानच ठरले आहे.वडिल स्व. माणकचंदजी बोथरा व मातोश्री स्व.जतनबाई बोथरा यांचा सेवा कार्याचा वारसा लाभल्याने बोथरा परिवार सामाजिक व धार्मिक कार्यात योगदान देत आहे.आरोग्य शिबिरांमध्ये सहभागी होण्याची संधी बोथरा परिवाराला लाभली आहे.हे आमचे भाग्य समजतो.यापुढील काळातही आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवाकार्यात बोथरा परिवार व पारस ग्रुपच्या माध्यमातून सर्व तो परी सहकार्य करू.आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी वरदानच ठरत आहे.असे प्रतिपादन बडी साजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष व पारस ग्रुपचे सर्वे सर्वा उद्योजक पेमराज बोथरा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्वर्गीय जतनबाई माणकचंदजी बोथरा यांच्या स्मरणार्थ व पारस ग्रुप यांच्या वतीने स्त्रीरोग,गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन उद्योजक

पेमराज बोथरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी सौ.मनीषा बोथरा,संतोष बोथरा,सतीश बोथरा,सौ.प्रतिभा बोथरा,खुशबू बोथरा,गौरव, समीक्षा,रोहन,प्रसन्ना, देवांश,काव्या बोथरा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया,डॉ.वसंत कटारिया,डॉ.आशिष भंडारी,सतिश लोढा,

माणकचंद कटारिया,सुभाष मुनोत,वसंत चोपडा,प्रकाश छल्लाणी,शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ. रवींद्र मुथा,डॉ.सोनल बोरुडे,डॉ.कृतिका पाटील आदी उपस्थित होते.

सतीश बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आरोग्य मंदिर आहे.येथे येणाऱ्या ■ पान ४ वर


भावपूर्ण श्रद्धांजली



कळविण्यात अत्यंत दुःख होते की आमचे वडील
कै. आसाराम तात्याबा रासकर
यांना मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी
रात्री ९ वाजता देवाज्ञा झाली. त्यांचा
दशक्रिया विधी
गुरुवार, दि. ५ मार्च रोजी
नालेगाव अमरधाम, अहिल्यानगर
येथे सकाळी ८.३० वाजता होणार आहे.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.
शोकाकुल
समस्त रासकर परिवार
पिंपळनेर (ता. पारनेर)। अहिल्यानगर

## दै. आकर्षण निवडक

### ‘शिवजयंती’ मिरवणुकीत कालमर्यादा दोन तास शिथील करावी




अहिल्यानगर - ०६ मार्च २०२६ रोजी तिथी प्रमाणे ‘शिवजयंती’ मिरवणुकीन कालमर्यादा दोन तास शिथील करुन रात्री १२ वा. पर्यंत ध्वनीक्षेपकः मिरवणुकीस परवानगी देण्यात यावी असे शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम ,जेष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे ,गटनेते दत्तात्रय कावरे ,विक्रम राठोड ,दत्ता जाधव ,परेश लोखंडे ,काका शेळके ,अरुण झेंडे ,प्रताप गडाख आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम म्हणाले कि दि. ०६ मार्च २०२६ रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव असून नगर शहर शिवसेना सालाबाद प्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करणार आहे. मिरवणूकीसाठी इतर धार्मिक सणांना वाढवून दिलेल्या कालमर्यादनुसार दोन तास शिथील करुन रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक, पारंपारिक वाद्ये वाजविण्यास व मिरवणुकीस परवानगी देण्यात यावी. ध्वनीप्रदुषण (नियंत्रण व नियमन) अधिनियम २००० चे नियम ५ (३) व शासन निर्णय क्र. ध्वनीप्र २०००/प्र.क्र.२४ ता.क्र. ३ (भाग ३) दि. ७ एप्रिल २००३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन परवानगी द्यावी. कृपया निवेदनाचे तात्काळ लेखी स्वरुपात देण्यात यावे ही विनंती.

### निमगाव वाघा येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणीचे आयोजन

अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघ यांच्या मान्यतेने निमगाव वाघा (ता. नगर) येथे वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा ‘महाराष्ट्र केसरी किताबाची लढत २०२५-२६’ या स्पर्धेसाठी जिल्हा व शहर संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी शनिवार, दि. ७ मार्च रोजी पार पडणार असून जिल्ह्यातील सर्व कुस्तीपटूंनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संयोजक पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.पै. प्रकाश बापू जगताप प्रतिष्ठान, सासवड यांच्या वतीने दि. १२ ते १५ मार्च दरम्यान सासवड (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे मातीवरील महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी जिल्हा संघाची निवड करण्यासाठी ही चाचणी घेण्यात येत आहे.ही निवड चाचणी ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८०, ८५, ९० किलो तसेच महाराष्ट्र केसरी गटासाठी ८५ ते १४० किलो वजन गटात होणार आहे. प्रत्येक वजन गटातून एका खेळाडूची, तर महाराष्ट्र केसरी गटातून दोन खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. निवड झालेला संघ सासवड येथे अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही संपूर्ण स्पर्धा संघटनेचे राज्य सचिव मोहन खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.निवड चाचणीत सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे वय किमान २० वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. १८ व १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंना वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच पालकांची संमतीपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### कांताबाई भळगट यांचे निधन

अहिल्यानगर- जैन पार्क , पूनम मोती नगर



मधील रहिवासी श्रीमती कांताबाई मनसुखलाल भळगट (वय ८६ वर्षे) यांचे मंगळवार दि. ३ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्या अतिशय धार्मिक आणि मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या .त्यांच्या मागे मुलगा सीए महेश, सून डॉ.दिपा, नातू अमेय , ३ मुली , नातवंडे , पतवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# नाथ कृपा पुरुष बचतगटाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नाथकृपा पुरुष बचतगटाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेत वर्षभरातील आर्थिक व्यवहार, बचत, कर्जवाटप तसेच विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गटाच्या पारदर्शक व शिस्तबद्ध कामकाजाचे सदस्यांनी एकमुखाने कौतुक करत आगामी काळात आणखी जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

सभेच्या प्रारंभी गटातील सदस्य सुनिल गायकवाड यांनी वार्षिक अहवाल आणि आर्थिक ताळेबंद सादर केला. बचतगटाने गेल्या वर्षभरात केलेल्या नियमित बचतीमुळे व सुयोग्य कर्ज वाटपामुळे सदस्यांना मोठा आधार मिळाल्याचे नमूद करण्यात आले. तसेच पुढील वर्षात विकासात्मक आणि रोजगाराभिमुख उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. सभेत नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली.

अध्यक्षपदी श्रीकांत सोनवणे, सचिवपदी दिपक कासवा, उपाध्यक्षपदी विक्रम लोखंडे यांची एक मताने निवड करण्यात आली. यावेळी माजी अध्यक्ष पद्माकर नवसुपे, काशिनाथ बोरगे, धनंजय गायकवाड, सुनील गायकवाड, संदेश गुजराथी, नितीन मुथा, शुभम पाचारणे, प्रविण राहिंज यांसह सर्व सदस्य उपस्थित होते.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष श्रीकांत सोनवणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बचतगट हा केवळ आर्थिक व्यवहारापुरता मर्यादित नसून समाजातील ऐक्य, परस्पर सहकार्य आणि स्वावलंबन वाढविण्याचे प्रभावी माध्यम आहे. आगामी काळात गट अधिक बळकट करण्यासाठी सर्व सदस्यांचे सहकार्य आवश्यक आहे. तसेच बचतगटाच्या माध्यमातून सदस्यांसाठी रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जाईल. महिला बचतगटांना ज्या प्रमाणे शासकीय योजना व बँक कर्ज सुविधा उपलब्ध होतात, त्याचप्रमाणे पुरुष बचतगटांनाही शासकीय योजना, बँकेकडून कर्ज सुविधा मिळाव्यात यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री,जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती आदीना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. सभेच्या शेवटी प्रविण राहिंज यांनी सर्वांचे आभार मानले.

# वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शन व विज्ञान प्रात्यक्षिकासह विज्ञान दिन समर्थ प्रशालेत उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी, माध्यमिक विभागात विज्ञान दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ पूजन करून झाली. त्यानंतर इयत्ता आठवीतील मुलं व मुली यांनी रेखाटलेल्या सुबक रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवर सौ क्रांती मुंदाणकर यांच्या हस्ते झाले. प्रशालेचे पर्यवेक्षक श्री एल एम कुलकर्णी सरांनी विज्ञान दिनाचे महत्त्व प्रास्ताविकेतून विषद केले. अतिथी परिचय विद्यार्थीनी गौरी दळवीने केला. प्रमुख अतिथींनी विज्ञानाचे प्रयोग प्रात्यक्षिकाद्वारे सादर केले. त्यानंतर मान्यवर अतिथींचे व विज्ञान अध्यापकांचे सत्कार संपन्न झाले. प्रशालेतील कुमारी अवंती चव्हाण, स्वरा वामन, रेणुका कुलकर्णी या विद्यार्थिनींनी विज्ञान दिनाची माहिती सांगितली.

अतिथींनी आपल्या मनोगततून प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सुप्त वैज्ञानिक दडलेला असतो असे भाष्य व्यक्त केले तसेच छोट्या गोष्टीतून मोठ्या संशोधनाची प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच शालेय समिती चेअरमन देशपांडे सरांनी विज्ञानदिना विषयी विद्यार्थ्यांना आवाहन करताना म्हटले, वैज्ञानिक प्रगतीत भारताचे नाव जागतिक स्तरावर घेतले जाते, गरज ही शोधाची जननी असुन विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी जवळीकता साधून आपल्या कल्पकतेने पालकांचे व शाळेचे नाव उंच करावे.

विविध विज्ञान स्पर्धा परीक्षांमध्ये बक्षीस पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली त्या सर्व विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी सिताराम सारडा विद्यालयाच्या शिक्षिका सौ. क्रांती मुंदाणकर, माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन माननीय ॲड. किशोरजी देशपांडे सर प्रशालेच्या प्राचार्य वसुधा जोशी, पर्यवेक्षक श्री एल एम कुलकर्णी, व विज्ञानाचे सर्व अध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी राजनंदिनी लंके हिने तर आभार कुमारी तनुश्री आढाव हिने मानले.

# सावेडी उपनगरात महापालिकेचे विवाह नोंदणी कार्यालय सुरू करण्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराचा वेगाने होणारा विस्तार आणि उपनगरांमधील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सावेडी उपनगरात महापालिकेचे स्वतंत्र विवाह नोंदणी कार्यालय सुरू करण्याची मागणी नगरसेवक रेवन्नाथ पवार यांनी केली आहे.

सध्या विवाह नोंदणीचे एकमेव कार्यालय जुने पालिकेच्या मुख्य इमारतीत असल्याने, तिथे मोठी गर्दी होत असून नागरिकांना दीर्घ काळ रांगेत उभे राहावे लागते.



नगरसेवक रेवन्नाथ पवार म्हणाले की, महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीतच विवाह नोंदणीचे एकमेव कार्यालय असल्याने उपनगरातील नागरिकांना लांबवरून प्रवास करून यावे लागते. शहराचा विस्तार झपाट्याने होत असून सावेडी परिसरात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# अबॅकसद्वारे विद्यार्थ्यांच्या बुध्दीला चालना - महापौर ज्योतीताई गाडे

**अहिल्यानगरमध्ये राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद । पाच मिनिटांत अवघड गणि ते सोडवत विद्यार्थ्यांनी उपस्थितांना केले थक्क**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्याला चालना देण्यासाठी युनिव्हर्सल अबॅकस ॲण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशन यांच्या वतीने अहिल्यानगर शहरात राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. टिळक रोड येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात आयोजित या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

सकाळच्या सत्रात घेण्यात आलेल्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी केवळ पाच मिनिटांच्या राऊंडमध्ये मोठमोठी व क्लिष्ट गणिते झटपट सोडवत आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटवला. अवघ्या काही मिनिटांत संपूर्ण पेपर पूर्ण करून विद्यार्थ्यांनी उपस्थित पालक व पाहुण्यांना अक्षरशः अवाक केले. ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेव्हल १ ते ५ तसेच वैदिक मॅथ्स अशा विविध गटांमध्ये घेण्यात आली. नगर, पुणे, शेवगाव, संभाजीनगर, दौंड, श्रीगोंदा, सोनई, कल्याण, मुंबई, मिरजगाव आदी ठिकाणांहून विद्यार्थी सहभागी झाले होते.

अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची एकाग्रता, वेग आणि अचूकता वाढीस लागते, याचा प्रत्यय स्पर्धेत वारंवार आला. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण गणिती प्रक्रियेची उदाहरणे अतिशय कमी वेळात पूर्ण करून आपली तयारी व सराव अधोरेखित केला. दुपारच्या सत्रात महापौर ज्योतीताई गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका दीपालीताई बारस्कर, संध्याताई पवार, डॉ. हर्षदा बडे, सौ. उज्वला राजू मुरकुटे, विद्या उदमले यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत सुनिल काळाणे यांनी केले. प्रास्ताविकात हेमलता काळाणे म्हणाल्या की, कुशाग्र बुद्धिमत्तेसाठी दोन्ही मेंदू सक्रिय असणे आवश्यक आहे. अबॅकसच्या सरावामुळे बौद्धिक विकासाला चालना मिळते व विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. स्पर्धा परीक्षांसाठी अबॅकस व वैदिक मॅथ्स अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी सांगितले.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी गुणवंत पिढी घडविण्याचे कार्य या संस्थेमार्फत होत असल्याचे नमूद केले. अबॅकस विद्यार्थ्यांच्या बुध्दीला चालना देत असून त्यामुळे विविध क्षेत्रांत विद्यार्थी गुणवत्ता सिद्ध करत आहेत, असे त्यांनी सांगितले.

दीपालीताई बारस्कर म्हणाल्या की, जगात विद्या दान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. अबॅकसच्या माध्यमातून घडलेला विद्यार्थी स्पर्धा परीक्षांसाठी सज्ज होतो. काही मिनिटांत अवघड गणित प्रक्रिया सोडविण्याची क्षमता त्यातून विकसित होते. संध्याताई पवार यांनी स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी मुलांची बौद्धिक क्षमता विकसित करणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असली तरी अबॅकसच्या सरावामुळे एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो, असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेचे परीक्षण सविता काकडे, अश्विनी साडूल, दीपाली अडलीगे, वैशाली काळाणे, संध्या महाडुळे यांनी केले. विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक ट्रॉफी व बक्षिसे प्रदान करण्यात आली. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वला मुरकुटे यांनी केले, तर आभार ऋग्वेदी काकडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल आढाव, बाळासाहेब दहातोंडे, राजेश गांगरडे, निकिता काकडे, पल्लवी हरडे, संदीप काळाणे तसेच युनिव्हर्सल अबॅकस असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

**राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेचा निकाल**

चॅम्पियन ऑफ चॅम्पियन: उत्कर्ष बाबासाहेब वागुले (अहिल्यानगर), अभय बाळासाहेब जगताप (संभाजीनगर), श्रेयश संभाजी भांडे (श्रीगोंदा), गौरी गणपत कणसे (पेडगाव), अदिती अभिमान ठोसर (पुणे), आराध्या विजय शेळके (शेवगाव)

चॅम्पियन: रिची मंगेश शेळके (कल्याण, मुंबई), आर्वी विशाल आढाव (श्रीगोंदा), ऐश्वर्या सूरज जायभाय (अहिल्यानगर), स्वराज सचिन देवकर (संभाजीनगर), प्रज्योत अविनाश कापसे (जामखेड), आराध्या अमोल कांबळे (अहिल्यानगर), आयुषी अमोल राठोड (वाळुंज), युवराज योगेश जाधव (शेवगाव), अरविंद विनोद जगताप (संभाजीनगर), पार्थ महादेव डमाळे (अहिल्यानगर), जगताप शरयू भालचंद्र (सारस नगर), शिवराज अमोल नवले (श्रीगोंदा), आर्या सुरज जायभाय (अहिल्यानगर), पवार साईकृष्ण राजेंद्र (अहिल्यानगर)

**महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी माजी सभापती अविनाश घुले यांची निवड**

# स्वर्गीय बाबा आढाव यांचा वारसा घुले पुढे घेऊन जातील - पालकमंत्री विखे

**पालकमंत्री यांच्या हस्ते सत्कार; कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा निर्धार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी महापालिकेचे माजी सभापती तथा नगरसेवक अविनाश घुले यांची एकमताने निवड झाली असून त्यांच्या नियुक्तीनिमित्त पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी पालकमंत्री विखे पाटील यांनी अभिनंदन करताना म्हटले, स्वर्गीय बाबा आढाव यांनी हमाल-माथाडी कामगारांना संघटित करून त्यांच्या हक्कासाठी आयुष्यभर झटले. अविनाश घुले हे त्यांच्या कार्यपद्धतीचा वारसा पुढे नेतील.

कष्टकऱ्यांच्या समस्या शासन दरबारी मांडून त्या सोडविण्यासाठी ते नक्कीच प्रयत्नशील राहतील.
तळागाळातील लोकांशी जोडलेले नेतृत्व म्हणून ते या पदाला खऱ्या अर्थाने न्याय देतील.




उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आपली भावना व्यक्त करताना अविनाश घुले म्हणाले की, माझी निवड ही माझ्यासाठी सन्मानासोबतच जबाबदारीही आहे.
स्वर्गीय बाबा आढाव यांनी हमाल-माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी झगडत न्याय मिळवून दिला.

त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून मीही कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि शासन पातळीवर ते सोडविण्याचे काम करणार आहे.

आवश्यक असल्यास आंदोलन किंवा उपोषण करूनही कामगारांचे प्रश्न मार्गी लावले जातील. कष्टकऱ्यांच्या आयुष्यात दिलासा निर्माण करणे हीच माझी प्राथमिकता राहील. महापालिकेचे माजी सभापती तथा नगरसेवक अविनाश घुले यांचा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी नगरसेवक सुभाष लोंढे, निखिल वारे, सुरेश बनसोडे, दत्ता गाडळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# ‘हिरव्या ऋतूंचा रंगमहाल’ न्यू आर्टस्‌मध्ये उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ज्येष्ठ कवी व गीतकार बाबासाहेब सौदागर यांच्या कविता व चित्रपटगीतांवर आधारित ‘हिरव्या ऋतूंचा रंगमहाल’ हा विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे होते. यावेळी बाबासाहेब सौदागर यांच्या पत्नी कविता सौदागर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, मराठी विभागप्रमुख डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे, तसेच कला शाखेतील इतर विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सागडे यांनी मराठी ही आपली मायबोली असून तिचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी सौदागर यांच्या गीतांमधून शेतकरी व सर्वसामान्यांचे प्रभावी प्रतिनिधित्व होत असल्याचे नमूद केले. ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या काव्याचा संदर्भ देत त्यांच्या कवितांचे इंग्रजी भाषांतर झाले असते तर त्या




विल्यम वर्डस्वर्थ यांच्या तोडीस तोड ठरल्या असत्या, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

प्रमुख अतिथी म्हणून बोलताना बाबासाहेब सौदागर यांनी आपल्या चित्रपट गीतलेखनातील प्रवास उलगडला. ‘सत्ताधीश’ चित्रपटातील ‘धाव पांडुरंगा आता धाव’ या आर्जव गीतापासून सुरुवात करत ‘चंद्रावाणी रूप तुझं रूप काळजात ठसलं’, ‘तुझा दुरावा’ या चित्रपटातील ‘स्पर्श झाला काळजाला’, आदी गीतांच्या निर्मितीमागील अनुभव त्यांनी सांगितले.

मराठी चित्रपटसृष्टीत शब्दांची पखरण करताना भाषेचे सौंदर्य जपत काळजीपूर्वक शब्दयोजना कशी करावी लागते, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. लावणी या गीतप्रकाराचे चित्रपटातील महत्त्व अधोरेखित करत त्यांनी विविध गीतांच्या ओळींमधून शब्दांची अर्थगर्भता स्पष्ट केली. यासाठी त्यांनी लिहलेल्या मोहरला मळा, सौजन्याचा सोहळा, ‘हात हाती धरा थांबा मुक्काम करा’ या त्यांनी लिहलेल्या लावण्यांची उदाहरणे दिली.

‘‘गीतकार हा परकायाप्रवेश करणारा योगी असतो,’’ असे सांगत त्यांनी सामाजिक आशय असलेल्या तसेच मनोरंजनप्रधान गीतांच्या निर्मितीमागील भूमिका स्पष्ट केली. ‘आज दिसताय टकाटक’ आणि ‘कोण वाचणार सांगा विधीलिखिताची भाषा’ या गीतांच्या निर्मितीची कथाही त्यांनी रसाळ शैलीत सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नवनाथ येठेकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. वैशाली भालसिंग यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन डॉ. मच्छिंद्र मालुंजकर यांनी केले. डॉ. महेबूब सय्यद, प्रा. निलेश लंगोटे, प्रा. सचिन धोत्रे व विभागातील विद्यार्थी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य पी. टी. शेळके, श्री.चंद्रकांत पालवे, श्री. गणेश भगत तसेच महाविद्यालयातील डॉ. पांडुरंग ठोंबरे, डॉ. मीना साळे, डॉ. भागवत ठाकूर, लेफ्टनंट प्रा. भरत होळकर, प्रा. आनंदा गडदरे, प्रा. संतोष वाघमारे, प्रा. अनिकेत डमाळे, प्रा मयुर रोहकले, प्रा. सागर सप्रे, प्रा. सुखदेव लोखंडे, प्रा. राजरत्न खिलारे, प्रा. वैष्णवी चत्तर, प्रा. अभिषेक फंड व इतर प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सौरभ भंडारी सी.ए. फायनल परीक्षा उत्तीर्ण

अहिल्यानगर- जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात



आलेल्या चार्टर्ड अकाऊंटसी परीक्षेत येथील सौरभ भंडारी सी.ए. फायनल परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. सौरभ हा अहमदनगर ग्राहक भांडारचे जनरल मॅनेजर सुरेंद्र भंडारी यांचा मुलगा आहे. त्याने आपली आर्टिकलशिप स्पाय अँण्ड कंपनी व एजीएमजी असोसिएट पूर्ण केली. त्याला सीए आनंद गांधी, सीए अजय गांधी, सीए सनित मुथा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल त्याचे ग्राहक भांडारचे चेअरमन विक्रम फिरोदिया व्हाईस चेअरमन शैलेश मुनोत, संचालक नरेंद्र फिरोदिया याच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

### डॉ. शुभम तांबे यांची उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरच्या शाहु महाराज कॉलेजमध्ये निवड

अहिल्यानगर - पारनेर तालुक्यातील गोरेगावचे



रहिवासी प्रकाश तांबे (हल्ली राहणार घाटकोपर, मुंबई) यांचे चिरंजीव डॉ. शुभम तांबे (एमबीबीएस) यांची पदव्युत्तर पदवी पोस्ट ग्रॅज्युएशन एम. डी. जनरल मेडीसीन या उच्च शिक्षणासाठी कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध राजर्षी छत्रपती शाहु महाराज गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेजमध्ये निवड झाली आहे. अहिल्यानगर येथील अ‍ॅड. बबनराव सुंबे यांच्या मेहुण्याचे ते चिरंजीव आहेत. शुभमचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

अहिल्यानगर- समाजात विविध क्षेत्रात



कार्य करणाऱ्यांचा राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. शहराच्या टिळकरोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात रविवार २२ मार्च रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळाव्यामध्ये समाजात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव केला जाणार आहे. या पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन मुख्य आयोजक अ‍ॅड. पोपटराव बनकर, अ‍ॅड. महेश शिंदे, गणेश बनकर, स्वाती डोमकावळे यांनी केले आहे. रयत प्रतिष्ठान, जय युवा अकॅडमी, जनवार्ता, क्रांती ज्योती बहुउद्देशीय संस्था, समृद्धी बहुउद्देशीय महिला संस्था, सावित्रीबाई फुले महिला संस्था, श्री संत सावता माळी युवक संघ तसेच जागृती बहुउद्देशीय संस्था आदींच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात समाजामध्ये विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्ती, शासकीय कर्मचारी-अधिकारी, सामाजिक संस्था, साहित्य क्षेत्र, महिलांच्या क्षेत्रात, आदर्श ग्रामपंचायत, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण, कला, क्रीडा क्षेत्र, उद्योग, व्यवसाय आणि सांस्कृतिक क्षेत्र अशा अनेक क्षेत्रांमध्ये निस्वार्थपणे सेवा करणाऱ्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र पुरस्काराचा स्वरुप असणार आहे. या कार्यक्रमासाठी उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, प्रा. सिताराम जाधव, शरदभाऊ झोडगे, महेश झोडगे, अंबादास गारुडकर, नितीन डागवाले, मंगल भुजबळ, प्रा. अश्विनी विधाते, सुवर्णाताई जाधव, जयश्री शिंदे, शेखर होले, स्वाती बनकर आदी परिश्रम घेत आहेत. इच्छुक व्यक्तींनी आपले प्रस्ताव १५ मार्चपर्यंत जनवार्ता जीवनसाथी द्वारा अ‍ॅड. महेश शिंदे, पावन गणपती मंदिरा शेजारी, जुन्या कोर्टा मागे, टांगे गल्ली, नालेगाव अहिल्यानगर ४१४००१ या पत्त्यावर पाठवावेत. उशिरा येणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९००४७२२३३० व ९९२१८१००९६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अहिल्यानगरचे उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी घेतली गुरुदेव श्री श्री रविशंकर यांची भेट

### ऐतिहासिक अहिल्यानगर भेटीचे दिले निमंत्रण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकर यांची बेंगळुरू येथील आश्रमात अहिल्यानगरचे उपमहापौर अ‍ॅड. धनंजय कृष्णा जाधव यांनी सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी त्यांच्यासोबत पवनजी गांधी आणि अजय मुथियान यांची प्रमुख उपस्थिती होती. या भेटीदरम्यान अहिल्यानगरच्या सर्वांगीण विकासावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक अहिल्यानगर शहरात येण्याचे आग्रहाचे निमंत्रण उपमहापौर अ‍ॅड. जाधव यांनी गुरुदेवांना दिले. या भेटीत शहराच्या आणि तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली:

महिला सक्षमीकरण: महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्यात वाढ करण्यासाठी विशेष उपक्रम राबवणे.

युवा नेतृत्व कार्यक्रम ( ): तरुणांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी आणि त्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून प्रशिक्षण देणे.

रोजगार आणि एमआयडीसी () विकास: अहिल्यानगरमधील औद्योगिक क्षेत्राचा () विस्तार करून स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे.

ऐतिहासिक वारसा: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सामाजिक उपक्रम राबवणे. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांनी अहिल्यानगरच्या शिष्टमंडळाचे कौतुक केले आणि शहराच्या प्रगतीसाठी आपले शुभाशीर्वाद व सहकार्य राहील, असे आश्वासन दिले. या भेटीमुळे अहिल्यानगरमध्ये लवकरच मोठ्या आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## व्यापारी बांधवांनी शहराबाहेर नवीन बाजारपेठ निर्मितीचा विचार करावा

### आडतेबाजार मर्चंट असोसिएशनकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आगामी पाच दहा वर्षांमध्ये शहराचा होणारा विस्तार विचारात घेऊन व्यापारी बांधवांनी शहराजवळ नवीन बाजारपेठ निर्माण करण्याचा विचार करावा, अशी मागणी शहरातील रहदारी समस्येचे अभ्यासक अभय ललवाणी यांनी आडतेबाजार मर्चंट असोसिएशनकडे निवेदनाद्वारे केली आहे.

असोसिएशनला दिलेल्या निवेदनात श्री ललवाणी यांनी म्हटले आहे की, आपल्या अहिल्यानगर शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. उपनगरांमध्ये देखील नागरी क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अहिल्यानगरची बाजारपेठ सध्या डाळमंडई - आडतेबाजार परिसरात आहे. सद्यस्थितीमध्ये या बाजारपेठेची जागा कमी पडत आहे. त्यामुळे बाजारपेठेत बाहेरून येणाऱ्या ग्राहकांना वाहतूक कोंडी सारख्या समस्येला सामोरे जावे लागते. या समस्येमुळे बाजारपेठेचा सध्याचा व्यवसाय मर्यादित झाला आहे.

वास्तविक नगर बाजारपेठेची क्षमता फार मोठी आहे. व्यापारी बांधवांनी एकत्र येऊन शहराबाहेर नवीन बाजारपेठ उभारण्याचा विचार केल्यास बाजारपेठेची उलाढाल निश्चीतच दहापटीने वाढू शकते. प्रत्येक व्यापारी दुकानदाराला व्यवसायासाठी मोठे मोठे प्लॉट, गोडाऊन, प्रशस्त पार्किंग नवीन बाजारपेठेमध्ये उपलब्ध होऊ शकतात. आजूबाजूच्या गावांमधून तालुक्यांमधून येणारे ग्राहक वाढू शकतात. मुख्य म्हणजे सध्याच्या बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या देखील सुटू शकते. ज्याप्रमाणे नेप्ती कांदा मार्केट विकसित झाले, तेथील व्यापार अनेक पटींनी वाढला, त्याप्रमाणेच नवीन बाजारपेठेचा विस्तार व उलाढाल वाढू शकते. त्यामुळे या सूचनेचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी श्री. ललवाणी यांनी केली आहे.

## अहिल्यानगर जायकाच्या वतीने मौलाना आझाद पुण्यतिथीनिमित्त पुस्तके वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मौलाना अबुल कलाम आझाद यांनी शिक्षणाला देशाच्या प्रगतीचा कणा मानले. त्यांचे स्वप्न होते की देशातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळावे आणि ज्ञानाच्या बळावर तो स्वतःचे भविष्य घडवावे.

आज अहमदनगर जायकाच्या वतीने बालसाहित्याची पुस्तके वाटप करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. पुस्तक हेच खरे मित्र असते. पुस्तक माणसाला विचार करायला शिकवते, स्वप्ने दाखवते आणि त्या स्वप्नांना पूर्ण करण्याची प्रेरणा देते. विद्यार्थी मित्रांनो, मोबाईल आणि टीव्हीच्या या युगात वाचनाची सवय जपणे खूप गरजेचे आहे. रोज थोडा वेळ पुस्तकांसाठी द्या. ज्ञान हेच तुमचे सर्वात मोठे बळ आहे. तुम्हीच उद्याचे सुजाण नागरिक, अधिकारी, डॉक्टर, अभियंते आणि देशाचे नेते आहात असे प्रतिपादन अहमदनगर जायका होटल चे संचालक नईम सरदार यांनी केले. अहमदनगर जायकाच्या वतीने स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या पुण्यतिथीनिमित्त जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, केडगाव येथे विद्यार्थ्यांना बालसाहित्याच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. शिक्षणप्रेमी आणि समाजाभिमुख उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी अहमदनगर जायका हॉटेलचे संचालक नईम सरदार, मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद खान, शिक्षिका आयेशा सुलताना तसेच साजीया हाशम खान आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील प्रेरणादायी व ज्ञानवर्धक पुस्तके देण्यात आली.

कार्यक्रमात वक्त्यांनी मौलाना आझाद यांच्या शैक्षणिक विचारांचा उल्लेख करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून ज्ञानसंपादन करावे, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्या बौद्धिक विकासास चालना मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## संतांच्या पायावर विश्वास ठेवा; त्यांचेच आपण दास होतो - ह.भ.प. ऋषिकेश महाराज खोसे

### सावेडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या तिसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्री जगद्गुरु तुकोबाराय प्रतिष्ठान, सावेडी आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि गाथा पारायण कीर्तन सोहळ्याच्या तिसऱ्या दिवसाची सेवा ह.भ.प. विद्वतरत्न ऋषिकेश महाराज खोसे यांच्या कीर्तनाने पार पडली. संताचीये पायी हा माझा विश्वास या अभंगावर त्यांनी सखोल निरूपण करून भाविकांना भक्तीचा, विचारांचा आणि विश्वासाचा नवा अर्थ सांगितला.

कीर्तन सेवेत ऋषिकेश महाराज म्हणाले, संतांच्या पायावर विश्वास ठेवला की त्यांचे आपण भावाने दास होतो. संतांवरचा विश्वास म्हणजे आत्मसमर्पण आणि त्या समर्पणातूनच आपले हित साधले जाते. या जगात सर्व व्यवहार, नाती, प्रपंच विश्वासावरच चालतात; पण तो विश्वास स्वार्थाने बांधलेला असतो, तर संतांवरील विश्वास निःस्वार्थ असतो.ते पुढे म्हणाले, संतच परोपकारी असतात. ते आपल्या शरीराचे कष्ट भोगून समाजाला कल्याणाचा मार्ग दाखवतात.

जगाच्या कल्याणासाठी, भक्तांच्या उद्धारासाठी ते जन्म घेतात. आई-वडिलांना आपल्यावर कळवळा असतो, पण ज्ञान नसते; श्रुतीमातेपाशी ज्ञान आहे, पण कळवळा नाही. मात्र संतांकडे 'हिताचे ज्ञान' आणि 'हिताचा कळवळा' या दोन्ही गोष्टी असतात. म्हणूनच संतच आपले खरे हित साधतात.

ऋषिकेश महाराज पुढे म्हणाले, आज जगभर युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत आहे, कारण मनुष्य जात विषयसुखाच्या मागे धावत आहे. धन, दारा, पुत्र, जन, बंधू हे सर्व क्षणभंगुर आहे; अंतकाळी आपला उद्धार करतो तो फक्त संत आणि भगवंत.'जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो, भुता परस्परे पडो, मैत्र जीवांचे' या अभंगाचा अर्थ सांगताना महाराज म्हणाले की, दुर्जनाला मारणे नाही, तर त्याच्या बुद्धीतील दुर्जनता काढणे हेच संतांचे कार्य आहे.


म्हणूनच संत विचारच आजच्या जगाला शांततेचा व मानवतेचा खरा मार्ग दाखवतात. संतांच्या आचरणानुसार जगणे म्हणजेच कायेने सेवा. काम करताना मुखात नामाचा जप ठेवणे ही वाचेची शरणागती, आणि मनाने सतत संत विचारात राहणे ही मनाची शरणागती. संतांवर विश्वास ठेवल्याशिवाय परमार्थ सफल होत नाही. ऋषिकेश महाराजांनी पुढे सांगितले की, वारकरी संत परंपरेचे तत्त्वज्ञान हेच विश्वशांतीचा मार्ग आहे. कीर्तन परंपरा श्रेष्ठ आहे; कारण स्वतः भगवंत नामदेवरायांच्या कीर्तनात नाचत होते. तो दिव्य प्रसंग जणू सजीव करून सांगताना भाविकांच्या डोळ्यांसमोर पंढरपूरचे राऊळ आणि पांडुरंग उभा ठाकला.

पंचदशी, विचारसागर, ज्ञानेश्वरी, नाथ भागवत या ग्रंथांतील उदाहरणे देत महाराजांनी संत परंपरेचा गाभा उलगडला आणि म्हटले की, ज्ञानोबा ते निळोबारायापर्यंत जे संत ग्रंथ आहेत, त्यांचा आपल्या जीवनात अंगीकार करणे म्हणजेच संतांच्या शेषाचे आवडीने सेवन करणे होय. कीर्तनाचा समारोप करताना त्यांनी सांगितले की, जगद्गुरु तुकोबाराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी गेल्या २७ वर्षांपासून हा हरिनाम सप्ताह चालू ठेवला आहे.

हा सातत्याचा उपक्रम म्हणजे भक्तीचा दीप प्रज्वलित ठेवणारा प्रेरणादायी प्रयत्न आहे. पत्रकारिता हे संत विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे एक बलवान साधन आहे. या माध्यमाचे कार्य हे परोपकाराचे असून, त्याची शक्ती प्रत्येकाचे भले करण्याची आहे. या कीर्तन सेवेसाठी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, ह.भ.प. संदीप महाराज खोसे, बाळासाहेब वाकळे, अशोक वाकळे, पुष्कर कुलकर्णी आदी मान्यवरांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेप्तीत महाराजस्व अभियान पूर्वतयारी बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महाराजस्व अभियान प्रभावी राबवण्यासाठी सरपंचांनी प्रयत्न करावेत- प्रांताधिकारी सुधीर पाटील



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील सुखकर्ता लॉन येथे राज्य शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान' यशस्वी होण्यासाठी नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी पुढाकार घेऊन पूर्वतयारी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला नेप्ती, निमगाव वाघा, हिंगणगाव, हमीदपूर, पिंपळगाव वाघा, जखणगाव, टाकळी खातगाव आदी गावांचे सरपंच, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी सुधीर पाटील होते.

नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने माजी सरपंच संजय जपकर, माजी उपसरपंच दादू चौगुले व माजी चेअरमन विलास जपकर यांच्या हस्ते प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे व नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांचा सत्कार करण्यात आला.

राज्य शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान' अंतर्गत नागरिकांचे महसुली व प्रशासकीय प्रश्न गावपातळीवरच सोडविण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी मनापासून प्रयत्न करून हे अभियान यशस्वी राबवावे, असे आवाहन प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी केले. अभियानाच्या पहिल्या टप्प्याच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

प्रांताधिकारी पाटील म्हणाले की, सध्या सेतू केंद्रांवर विविध दाखल्यांसाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. या गर्दीवर उपाय म्हणून ग्रामपंचायतींनी 'आपले सरकार' सेवा केंद्रांमार्फत नागरिकांना व विद्यार्थ्यांना विविध दाखले उपलब्ध करून द्यावेत. यामुळे नागरिकांची गैरसोय टळेलच, शिवाय ग्रामपंचायतींच्या उत्पन्नातही वाढ होईल. ते पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे प्रश्न तत्काळ सोडवून लोककल्याणकारी राज्यकारभार उभा केला. त्याच धर्तीवर राज्य शासनाने नागरिकांचे प्रश्न जागेवरच सोडविण्यासाठी हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे. लाभार्थी नागरिकांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावून 'रयतेचे राज्य' पुन्हा साकार करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

या बैठकीत महाराजस्व अभियानांतर्गत विविध महसुली कामांना गती देण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. भोगवटादार वर्ग दोन जमिनींचे वर्ग एकमध्ये रूपांतर करणे, प्रलंबित व कालबाह्य सातबारा नोंदी मोहिमेद्वारे काढून टाकणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांच्या याद्या तयार करणे तसेच प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या खरेदी-विक्री व्यवहारांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक दाखल्यांच्या याद्या तयार करणे, घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची नोंद करणे, पट्टे वाटप प्रक्रियेची पूर्वतयारी करणे, तसेच बळीराजा पाणंद शेतरस्ते खुले करण्यासाठी ग्रामपंचायतींनी आराखडे तयार करावेत, असेही सूचित करण्यात आले.

पोटखराबा 'अ' मधील जमिनींची आकारणी, प्रलंबित फेरफार व तक्रारींचे तत्काळ निवारण, एकाच ठिकाणी अर्ज स्वीकृती, पडताळणी व सेवा वितरण या सुविधा शिबिरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महाराजस्व शिबिरात सातबारा ई-फेरफार नोंदणी व दुरुस्ती जागेवरच केली जाणार असून उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र तसेच 'नॉन क्रिमिलेयर' दाखल्यांचे अर्ज स्वीकारून त्यांचे वितरण करण्यात येणार आहे.

या बैठकीला तहसीलदार संजय शिंदे, नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे, माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, नेप्तीचे माजी सरपंच संजय जपकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, उपसरपंच एकनाथ जपकर, माजी चेअरमन विलास जपकर, उपसरपंच दादूभाऊ चौगुले, बबन फुले, बंडू जपकर, मंडळातील ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा राधवन, रूपाली म्हस्के, दिपाली विधाते, विनायक दीक्षे, दिपक झेंडे, सुभाष नेमाने, अविनाश नरवडे, जखणगावचे सरपंच डॉ. सुनील गंधे, टाकळीचे सरपंच राजू नरवडे, हिंगणगावचे सरपंच पोपट ढगे, उपसरपंच सुनील नरवडे, सरपंच परिषद राज्य कोर कमिटी अध्यक्ष आबासाहेब सोनवणे, निमगाव वाघाचे सरपंच उज्वला कापसे, उपसरपंच किरण जाधव, सागर कापसे, पिंपळगाव वाघाचे सरपंच दिलीप नाट, जालिंदर बेल्हेकर, तुकाराम बेल्हेकर, अशोक सोनवणे, गोरख जपकर, विनोद चाबुकस्वार, धीरज कुलट, पांडुरंग कळमकर, राजेंद्र होळकर, सतीश होळकर, रामदास पुंड, मल्हारी कांडेकर, मच्छिंद्र होळकर, सुलोचना नाट, रमेश आंग्रे, तात्यासाहेब कर्डिले, सुरेश रूपनंद, स्वप्निल डोंगरे, अरुण कापसे, सखाराम बेल्हेकर, पोपट कोल्हे, मुबारक शेख, लतीफ शेख, राज मोहम्मद शेख तसेच परिसरातील गावांचे सरपंच, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग १५ मध्ये विकासाचा नवा टप्पा

## केडगाव लिंक रोडवरील जेएलपी टॉवर येथे ड्रेनेज लाईन व सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक १५ मधील केडगाव लिंक रोड परिसरात जेएलपी. टॉवर शेजारील साईदीप कॉलनी व नवोदय कॉलनी भागात ड्रेनेज लाईन व सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ उत्साहात पार पडला. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या विकास निधीतून तसेच माजी उपमहापौर नगरसेविका गीतांजली ताई काळे, स्थायी समिती सदस्या पौर्णिमाताई गव्हाळे, नगरसेवक दत्ताभाऊ गाडळकर, नगरसेवक सुजय मोहिते यांच्या प्रयत्नातून या कामाचे प्रारंभ करण्यात आले.



या शुभारंभ प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक अमोल येवले, विजय पठारे, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, सुनील काळे, अरुण नाणेकर, विलास भिंगारदिवे, बाबासाहेब ठाणगे, नंदू लांडगे, भाऊसाहेब चौधरी, मनोज लाटे, दिलीप दहिफळे सर, संभाजी पवार, महेश सोनी, संतोष जाधव, महादेव शिंदे, योगितााताई बोरुडे, शिवाजीराव नाईकवाडे, इंदूमती दहिफळे, उमादेवी राऊत, ज्योती खरमाळे, विमल वावळ, श्रीपाद गराडे, विजय सोलंकी, सचिन गायकवाड, जालिंदर पालवे, अप्पासाहेब गागरे, अनिल वाडेकर, मनीष कुमार, संजय बेलपवार, विशाल कर, आदित्य पालवे, पांडुरंग घोडके, योगेश गुगळे, गोपी जरबंडी, संकेत गव्हाळे, महेश सुपेकर, अनिल येलमाने, शुभम लांडगे, सचिन सप्रे, कृष्णा लांडे, विशाल कड, बाळू डागवाले, सुरज काळे, आनंद बोरुडे, राजेंद्र गहिले, बाळासाहेब खरमाळे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, अहिल्यानगर शहरात पुणेमुंबईप्रमाणे दर्जेदार रस्त्यांची कामे सुरू आहेत. या परिसराची पाहणी केल्यानंतर रस्त्याचा प्रश्न प्राधान्याने मांडला आणि आज त्याची पूर्तता होत आहे. विकासाला वेळ लागतो, मात्र विकास नक्कीच होणार.

त्यांनी पुढे नागरिकांना कचरा मुक्त शहराच्या संकल्पाचे आवाहन केले. ''सर्व सुविधा उपलब्ध करून देताना नागरिकांनीही आपले कर्तव्य पार पाडावे. घरासमोर व मोकळ्या जागेत झाडे लावा, परिसर स्वच्छ ठेवा आणि कचरा मुक्त करण्यासाठी जनजागृती करा. आपण परदेशात गेल्यावर तेथे कचरा टाकण्याचे धाडस करत नाही, मग आपल्या भारतभूमीत का? अशी भावनिक हाक त्यांनी दिली. तसेच पुढे नगरसेवक स्थायी समिती सदस्य पौर्णिमाताई गव्हाळे, गीतांजली काळे, दत्ताभाऊ गाडळकर व सुजय मोहिते यांनी सांगितले की, मागील पाच वर्षांत या भागात कोणतीही मोठी विकासकामे झाली नव्हती.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाचा प्रारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशभरात विविध विज्ञान उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित करून राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. या वर्षीच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची थीम ''विज्ञानातील महिला: उत्प्रेरक विकसित भारत'' अशी आहे. सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये, विज्ञान सप्ताहाच्या कार्यक्रमांमध्ये मध्ये इयत्ता सहावीआणि सातवी विद्यार्थ्यांसाठी श्रीमती प्रियांका मंगलराप यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शन ( प्रकल्प )स्पर्धा यासारख्या विविध उपक्रमांचा समावेश होता, जिथे अंदाजे १०० प्रकल्पांना परीक्षक श्रीमती इशरत मोईन शेख आणि श्रीमती अमर्रिंदर कौर यांनी परीक्षण केले. विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि विज्ञान उपकरणे प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. ती उपकरणे वैज्ञानिक संकल्पनांची समज अधोरेखित करत होती . विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व विज्ञान विकसित होण्यासाठी, इयत्ता आठवी आणि नववी साठी एकूण चार गटांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्याचे नेतृत्व प्राचार्य कु. गीता तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान शिक्षिका सौ. इशरत शेख आणि सौ. तस्नीम सैफी यांनी केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसला, ज्यांनी त्यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाची चाचणी घेतली. आनंदऋषी रक्तपेढीला इयत्ता ८ वी आणि ९ वी साठी क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या क्षेत्रभेटीसाठी आनंद ऋषी ब्लड बँकचे प्रमुख सुनील महानोर यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.या सोहळ्यात विज्ञानविषय विद्यार्थी प्रतिनिधी ऋतुजा भोंडे आणि कृष्णा खराडे यांची नामवंत शास्त्रज्ञांची भाषणे, वैज्ञानिक उपकरणांचे प्रदर्शन आणि संवादात्मक सत्रांचाही समावेश होता. या कार्यक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानात करिअर करण्यासाठी प्रेरित करणे, तसेच वैज्ञानिक स्वभाव आणि जिज्ञासा वाढवणे. राष्ट्रीय विज्ञान दिन साजरे करणे हे भारतातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रचार करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे आणि विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र येऊन विज्ञानाचे प्रयोग साजरे करतात हे पाहणे आनंददायी होते.तसेच विज्ञान विषयावर आधारित चार गटांच्या विभाजनाप्रमाणे प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात आले होते त्यापैकी ने प्रथम क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांना शिक्षिका सुमन कदम व आशा रंगलानी यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. द्वितीय क्रमांक ग्रुपच्या विद्यार्थ्यांना मिळाला. या विद्यार्थ्यांना शिक्षिका प्रियंका मंगलारप व वैशाली शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ कांचन पापडेजा व सौ .करिष्मा नवलानी उपस्थित होत्या .विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल माध्यमिकच्या प्राचार्या गीता तांबे मॅडम व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा व सौ.करिष्मा नवलानी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले . संस्थेचे अध्यक्ष श्री.राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोदर माखिजा विश्वस्त श्री. महेश मध्यान श्री. सुरेश हिरानंदानी , श्री. राजकुमार गुरुनानी श्री. हरेश मध्यान यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# सावेडीतील ज्ञानसंपदा शाळेत ‘माय मराठी व संस्कार’ कीर्तन सेवा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आणि कविवर्य कुसुमाग्रज जयंती निमित्त सावेडीतील उपक्रमशील शाळा ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी माय मराठी व संस्कार या विषयावर कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले.

कीर्तनसेवेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अभिजात मराठी भाषेची रुजवात करणे, मराठी संत साहित्य, लोकसाहित्य व साहित्य संपदा याबाबत माहिती मिळवणे तसेच माय मराठीचे संवर्धन करणे असा होता.

कीर्तन सेवा प्रसिद्ध बाल कीर्तनकार हरिभक्त परायण कु. रेणुकाताई निसळ यांच्या अमृतवाणीतून साकार झाली. ताईनी जगदगुरु संत तुकाराम महाराज यांचे अभंग रसाळ वाणीतून सादर करत विद्यार्थ्यांना देव, देश आणि धर्म याबाबत कर्तृत्व सिद्ध करण्यास प्रेरित केले. तसेच मराठी भाषेचे महत्त्व, आई-वडिलांचे योगदान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य व पराक्रमाचा आदर्श आत्मसात करावा, असे सांगितले.

कीर्तनात हार्मोनियमची साथ कल्याण मुरकुटे आणि तबल्याची साथ हर्षद भावे यांनी दिली.

या कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार अविनाश बापर्डीकर, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत भाग्यश्री जाधव, प्रास्ताविक शिल्पा कुलकर्णी, तर कीर्तनकार ताईचा परिचय कैलास जाधव यांनी दिला.कीर्तनसेवा विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजवण्यास आणि मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगण्यास उपयुक्त ठरली.



**महाफुले चौकातील आनंदधाम येथे शहर वाहतूक शाखेच्या वतीने वाहनांची तपासणी करण्यात आली. (छाया – संभव काथेड)**

# वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शन व विज्ञान प्रात्यक्षिकासह विज्ञान दिन समर्थ प्रशालेत उत्साहात साजरा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी, माध्यमिक विभागात विज्ञान दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ पूजन करून झाली. त्यानंतर इयत्ता आठवीतील मुलं व मुली यांनी रेखाटलेल्या सुबक रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवर सौ क्रांती मुंदाणकर यांच्या हस्ते झाले. प्रशालेचे पर्यवेक्षक श्री एल एम कुलकर्णी सरांनी विज्ञान दिनाचे महत्त्व प्रास्ताविकेतून विषद केले. अतिथी परिचय विद्यार्थीनी गौरी दळवीने केला. प्रमुख अतिथींनी विज्ञानाचे प्रयोग प्रात्यक्षिकाद्वारे सादर केले. त्यानंतर मान्यवर अतिथींचे व विज्ञान अध्यापकांचे सत्कार संपन्न झाले. प्रशालेतील कुमारी अवंती चव्हाण, स्वरा वामन, रेणुका कुलकर्णी या विद्यार्थिनींनी विज्ञान दिनाची माहिती सांगितली.

अतिथींनी आपल्या मनोगततून प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सुप्त वैज्ञानिक दडलेला असतो असे भाष्य व्यक्त केले तसेच छोट्या गोष्टीतून मोठ्या संशोधनाची प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच शालेय समिती चेअरमन देशपांडे सरांनी विज्ञानदिना विषयी विद्यार्थ्यांना आवाहन करताना म्हटले, वैज्ञानिक प्रगतीत भारताचे नाव जागतिक स्तरावर घेतले जाते, गरज ही शोधाची जननी असुन विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी जवळीकता साधून आपल्या कल्पकतेने पालकांचे व शाळेचे नाव उंच करावे.

विविध विज्ञान स्पर्धा परीक्षांमध्ये बक्षीस पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली त्या सर्व विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी सिताराम सारडा विद्यालयाच्या शिक्षिका सौ. क्रांती मुंदाणकर, माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन माननीय ॲड. किशोरजी देशपांडे सर प्रशालेच्या प्राचार्य वसुधा जोशी, पर्यवेक्षक श्री एल एम कुलकर्णी, व विज्ञानाचे सर्व अध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी राजनंदिनी लंके हिने तर आभार कुमारी तनुश्री आढाव हिने मानले.

# मास्टरमाईंड प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवत्ता यादीत हिंद सेवाचे १२ विदयार्थी चमकले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्यास्तरीय मास्टरमाईड प्रज्ञाशोध परीक्षेत हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा,बागडपट्टी विभागातील इयत्ता चौथी मधील चिन्मय म्हस्के हा राज्यात दुसरा आला. तसेच जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत जिविका ताकपेरे -जिल्हयात पाहिली, राजकुमार निसाद - जिल्हयात पहिला,आदिती खेडकर -केंद्रात प्रथम,गायत्री गायकवाड -तालुक्यात तीसरी,इयत्ता तीसरी मधील सेजल शेळके -जिल्हयात सहावी,लाड सर्वेश -जिल्हयात सातवा,श्रावणी जाधव- तालुक्यात प्रथम,विश्वजीत गंगावणे- तालुक्यात तिसरा,इयत्ता दुसरी मधील अमृता बेरड -जिल्यात दुसरी,गीत जपे जिल्हयात दुसरी,समृध्दी पठारे - तालुक्यात तिसरी आली आहे.

स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे,सौ.मनिषा साळी,मुदस्सिर पठाण,सौ.अरुणा धाडगे,सौ. विदया पोतदार, अभिजित जवादे,श्रीम.मनिषा जंगम आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे.

स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विदयार्थी म्हणजे शाळेची शान आहे.स्पर्धा परीक्षेचे तयारी घेण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक अत्यंत परिश्रम घेतात.दरवर्षीप्रमाणे हिंद सेवा मंडळाचे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम राखली आहे.असे गौरवोद्गार शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी काढले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतूक हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी केले.

# धामोरी कोपरगाव मार्गावर काही भागात खड्डुयांचे साम्राज्य

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**धामोरी–** कोपरगाव तालुक्यातील धामोरी - कोपरगाव या राज्य मार्गावर काही भागात म्हणजे काळधोंडी ते सांगवी फाटा या राज्यमार्गावर मोठ मोठे धोकेदायक खड्डे पडलेले आहे. वाहन चालकाला मोठ्या कसरीतीने आपले वाहन चालवावे लागते. मोटारसायकल वाहकांचे छोटे मोठे अपघातही होतात. या राज्य मार्गावर सांगवी फाटा येथे कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत शेतकरी उपबाजार मार्केट असुन त्यासाठी शेतकरी साठीही महापपुर्ण समजाला जातो. तसेच तालुयाच्या ठिकाणी जाण्यासाठीही महात्वाचा आहे. धामोरी,मायगाव देवी, चासनळी व ईतरत्र नाशिक जिल्ह्यातील प्रवाशांसाठीही दळणवळणाच्या दृष्टीने महावपुर्ण समजला जातो.

तरी संबधीत बांधकाम विभाग, सडक योजने अंतर्गत अधिकारी यांनी याकडे लक्ष देवुन तत्पर रस्ता दुरुस्ती करावी. अशी मागणी परिसरातील शेतकरी नागरिक व प्रवशांकडुन केली जात आहे.

(पान १ वरून)

## शिर्डीत एलसीबीच्या कारवाईत ४०० किलो मांगुर मासा जप्त

यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदरचे मासे हे मिराज (पूर्ण नाव माहिती नाही) याने पश्चिम बंगाल येथून भरुन दिलेले असून ते खोपोली मुंबई येथे भाई (पूर्ण नाव माहित नाही) याच्याकडे घेऊन जात असल्याची कबुली दिली. या कारवाईत चार लाख रुपये किमतीचे प्रतिबंधित ४०० किलो मांगुर मासे तसेच २५ लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण २९ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी मत्स्य विकास अधिकारी प्रतीक्षा सुधाकर पाटेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३, २७५, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक दीपक मेढे, पोलीस अंमलदार राहुल द्वारके, शाहिद शेख, फुरकान शेख, राहुल डोके, सुनिल मालणकर, प्रशांत राठोड, सतिष भवर, चालक उमाकांत गावडे, उत्तरेश्वर मोराळे यांच्या पथकाने केली.

## नगरमध्ये डॉ. सुजय विखे पाटील यांचा जनता दरबार

व्यक्त केल्या. कर्डिले साहेबांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळावी, अशी कार्यकर्त्यांची भावना असून अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठी घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील भाजप संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी नमूद केले की, संघटनेत दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देणे आणि त्यांना योग्य स्थान मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे. कार्यकर्त्यांच्या बळावरच जिल्ह्यात भाजपची ताकद वाढली असून आगामी काळात संघटनात्मक काम अधिक गतिमान करण्यावर भर दिला जाईल. यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल पक्षश्रेष्ठी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे मनापासून आभार मानले. सर्वांच्या विश्वासामुळेच ही जबाबदारी मिळाली असून त्याबद्दल आपण सर्वांचे ऋणी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## ओबीसी राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्षपदी दिपक खेडकर तर कार्याध्यक्षपदी नितीन घोडके यांची निवड

यावेळी दीपक खेडकर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ओबीसी संघटनेच्या शहर जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे.ही निवड सार्थ करण्यासाठी ओबीसी संघटनेचे माध्यमातून पक्षाच्या वाढीसाठी व पक्षाची सर्व ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच ओबीसी समाजाच्या न्याय हक्क व प्रश्न सोडवण्यासाठी कायम प्रयत्नशील राहू.असे आश्वासन दिले.

## कामाच्या माध्यमातून पदाला न्याय द्या – आ. संग्राम जगताप

बाजूला ठेवून प्रामाणिकपणे काम करा. पद हे जबाबदारीचे आहे. समाजातील प्रश्न सोडविणे, शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविणे हीच खरी कार्यकर्त्यांची ओळख आहे. नवनियुक्त पदाधिकारी सुरज कोतकर, दीपक खेडकर, नितीन घोडके, सुरज शिंदे आणि ज्ञानदेव अकोलकर यांनी संयुक्तपणे सांगितले, आम्ही आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरातील जनतेच्या प्रश्नांवर काम करू.

मिळालेल्या पदाच्या माध्यमातून समाजामध्ये सकारात्मक बदल घडवू आणि पक्षाची ताकद वाढवू. या कार्यक्रमाला प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक दगडू मामा पवार, नगरसेवक विकी जगताप, अविनाश घुले, अमोल गाडे, गटनेते प्रकाश भागानगरे, रेवणनाथ पवार, विशाल नाकाडे, रवींद्र बारस्कर, बापूशेठ नागरगोजे आदी मान्यवर उपस्थित होते.

## आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी वरदानच ठरत आहे – पेमराज बोथरा

रुग्णाला उत्तम आरोग्य सेवा मिळावी यासाठी येथील सर्व डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ निस्वार्थ पणे सेवा देत आहेत.

खुशबू बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल चे कार्य कौतुकास्पद आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात बोथरा परिवाराचा नेहमीच सहकार्य राहणार आहे.बोथरा परिवाराला शिबिराच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलण्याची संधी दिल्याबद्दल जैन सोशल फेडरेशनचे आभार.

प्रास्तविकात डॉ.प्रकाश कांकरिया म्हणाले,आनंदऋषीजी हॉस्पिटल या आरोग्य मंदिराच्या उभारणीसाठी बोथरा परिवाराचे योगदान लाभत आहे.तसेच पारस ग्रुपचे आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात नेहमीच सहकार्य मिळत असते.४ मार्च ते ३० मार्च या काळात महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून १६ आरोग्य शिबिरांची मालिका होणार आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलचे यंदा रौप्य महोत्सवी वर्षे आहे. हॉस्पिटलला एन.ए.बी.एच. मान्यता मिळालेली असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेड्सचे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग,आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन कक्ष,परिपूर्ण फिजिओथेरपी,नेत्रालय, हृदयरोग विभाग,दंतरोग तपासणी विभाग आहे.आत्तापर्यंत एक लाखाहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया नेत्रालय विभागाच्या मार्फत करण्यात आले आहेत.या शिबिरांसाठी समाजातील दानशूर व्यक्ती यांच्या सद्भावना सोबतच संतोष बोथरा,पेमराज बोथरा व बोथरा परीवार यांचे मोलाचे योगदान लाभत असते.

डॉ.कृतिका पाटील म्हणाले, स्त्रीरोग व गर्भवती माता तपासणी शिबीरात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया,गर्भ पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये पॅकेज, सिझेरियन १० हजार रुपयात केले जाईल. शिबिरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनोग्राफी, रक्त,लघवी इत्यादी तपासण्या ५० टक्के सवलतीत केल्या जातील. शिबिरापासून पुढे एक महिना या सवलतीचा लाभ मिळेल.शिबिरात सहभागी होणाऱ्या महिलांना बाळंतपणावेळी बिलात ५० टक्के सवलत दिली जाईल.या शिबिराच्या जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा.

या शिबिरात ७२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले.तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.